**सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय. ०९–००००३–२०१५**

**नियमित दिवाणी दावा क्र. १/२०१५**

**निशाणी क्र. ३१२ वरील आदेश**

प्रस्ततुचा अर्ज वादी याने प्रतिवादी क्र. ३ चे वारस अभिलेखावर आणणेस झालेला विलंब माफ होवून त्याचे वारस रेकॉर्ड घेवून तशी दुरुस्ती करणेसाठी दाखल केला आहे.

२. वादीने आपल्या अर्जात असे कथन केले आहे की, प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र. ३ सुमित्रा नथुराम तिर्लोटकर हीचे दि. ०२/११/२०२३ रोजी तिर्लोट, ता. देवगड येथे निधन झाले आहे. त्यांचे वारस याकामी दाखल करीत आहेत. सदर प्रतिवादी क्र. ३ ही वादींचे वंशावळीतील नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. ३ चे निधनाबाबत वादींस काहीच माहीती नव्हती. सदर दाव्याचे कामी प्रतिवादींतर्फे सदर प्रतिवादी क्र. ३ मयत असल्याची पुरशीस मे. न्यायालयात दाखल करण्यात आली. त्यावेळी वादीस सदर प्रतिवादी ही मयत असल्याची माहीती मिळाली. त्यानंतर तीचे वारसांबाबत माहीती घेऊन वादी आता तीचे वारस दाखल करत आहे. सदर वारस दाखल करणेस वादींनी मुद्दाम विलंब केलेला नाही. केवळ वर नमुद परिस्थितीमुळे सदर विलंब झालेला आहे. सदर विलंब माफ होऊन प्रतिवादीचे वारस रेकॉर्डवर येणे गरजेचे आहे. त्यामुळे सदरचे वारस दाखल करणेस झालेला विलंब माफ होवून त्यांचे वारस रेकॉर्डवर आणणे परवानगी मिळणेची विनंती वादीने केली आहे.

३. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार विलंब माफीची दिलेली कारणे चुकीची, बेकायदेशीर व खोटी आहेत. तरी सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती प्रतिवादीने केली आहे.

४. या ठिकाणी हे नमूद करणे आवश्यक आहे की, वादीने निशाणी क्र.३१५ सोबत मयत प्रतिवादी क्र.३ चा मृत्यूचा दाखला हजर केला आहे. सदरच्या मृत्यू दाखल्याचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र. ३ सुमित्रा नथुराम तिर्लोटकर या दिनांक ०२/११/२०२३ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. प्रस्तुतचा अर्ज वादीने उशिराने दाखल केलेला आहे. निधनाबाबत वादीस माहिती नव्हती हे कारण स्विकारार्ह नाही.

प्रस्तुतचा दावा हा ठरावासाठी व कायम ताकिदीसाठी दाखल केलेला आहे. मात्र न्यायालयास परिणामकारक व परिपुर्ण निवाडा करताना व वादी, प्रतिवादी यांच्यामध्ये असलेले वादाचे संपुर्ण निराकरण एकाच दाव्यामध्ये होणेसाठी न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून प्रस्तुत अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**– आदेश –**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने प्रतिवादींना रक्कम रुपये २००/– देण्याच्या अटीवर मयत प्रतिवादी क्र.३ चे वारस अभिलेखावर आणणेस झालेला विलंब माफ करणेत येत आहे.

NANDA BAPUSO GHATAGE
Digitally signed by NANDA BAPUSO GHATAGE
Date: 2024.10.10 14:44:12 +0530

( श्रीमती एन.बी.घाटगे )

दिनांकः ०९/१०/२०२४ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड.